पीकपाणी

# जवस पिकाची सुधारित पद्धतीने लागवड



डॉ. एस.टी. आघाव
डॉ. रमेश भदाणे
डॉ. व्ही.आर. पाटील
कडधान्ये व तेलबिया संशोधन आणि प्रशिक्षण केंद्र, पंढरपूर



जवस पिकाकरिता मध्यम ते भारी, ओलावा टिकवून ठेवणारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी आणि आम्ल-विम्ल निर्देशांक ६.५ ते ७.५ च्या दरम्यान असणारी जमीन निवडावी. खरीप हंगामातील मूग, उडीद व सोयाबीन पीक घेतल्यानंतर जमीन नांगरून टाकावी व हेक्टरी १० गाड्या चांगले कुजलेले शेणखत टाकून, वखराच्या दोन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी.

रब्बी हंगामातील जवस हे महत्त्वाचे पीक आहे. महाराष्ट्रात ९८ हजार हेक्टर तर विदर्भात ६० हजार हेक्टर क्षेत्रावर हे पीक घेतले जाते. विदर्भातील थंड हवामान या पिकास उपयुक्त आहे. हे पीक जिरायती आणि बागायती लागवडीस योग्य आहे. या पिकाची उत्पादकता वाढविण्यासाठी वेळेवर लागवड, सुधारित वाणांचा वापर आणि किडी व रोगांपासून संरक्षण या बाबींकडे शेतकऱ्यांनी काळजीपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे.

**जमिनीची निवड व पूर्वमशागत** : या पिकाकरिता मध्यम ते भारी, ओलावा टिकवून ठेवणारी, पाण्याचा उत्तम निचरा होणारी आणि आम्ल-विम्ल निर्देशांक ६.५ ते ७.५ च्या दरम्यान असणारी जमीन निवडावी. खरीप हंगामातील मूग, उडीद व सोयाबीन पीक घेतल्यानंतर जमीन नांगरून टाकावी व हेक्टरी १० गाड्या चांगले कुजलेले शेणखत टाकून वखराच्या दोन पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. त्यामुळे जमिनीत ओलावा टिकून ठेवण्याची क्षमता वाढते.

**पेरणीची वेळ** : या पिकाच्या वेळेवर पेरणीला फार महत्त्व आहे. वेळेवर पेरणी केली तर गादमाशी ही कीड व मर या रोगाचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात



आढळून येतो व उत्पन्नात वाढ होते. म्हणून कोरडवाहू जवस पिकाची पेरणी ऑक्टोबरच्या पहिल्या पंधरवड्यात तर **बागायती पिकाची पेरणी नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात करावी.**

**बीजप्रक्रिया** : पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करणे अत्यंत



आवश्यक आहे. त्यासाठी २ ग्रॅम बाविस्टीन + २ ग्रॅम थायरम प्रतिकिलो बियाण्यास चोळावे. यामुळे मर व अल्टरनेरिया ब्लाईट या रोगांचा प्रादुर्भाव कमी होतो.

**आंतरपीक** : या पिकात जवस + हरभरा, जवस + करडई (४:२), जवस + मोहरी (५:१) या प्रमाणात आंतरपीक घेता येते. प्रयोगाद्वारे असे सिध्द झाले आहे की जवस + हरभरा (४:२) या प्रमाणात घेतल्यास ही आंतरपीक पध्दती आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे.

**पेरणी** : पिकाची पेरणी मुख्यत्त्वे चाड्याच्या तिफणीने करावी. दोन ओळींतील अंतर ३० किंवा ४५ सें.मी. ठेवावे. पेरताना बियाणे योग्य खोलीत पडेल याची काळजी घ्यावी.

**बियाण्याचे प्रमाण** : ८ ते १० किलो/ हेक्टरी बियाणे वापरावे.

**रासायनिक खतांची मात्रा** : कोरडवाहू

**जवसाचे सुधारित वाण व त्यांचे गुणधर्म**

| वाणाचे नाव | कालावधी (दिवस) | तेलाचे प्रमाण (%) | हेक्टरी उत्पन्न (किलो) |
|---|---|---|---|
| एन एल ९७ | ११५-१२० | ४४ | ६००-१२०० |
| एन एल १४२ | ११८-१२३ | ४२ | १५१० ओलिताखाली |
| एन एल १६५ | ११६-१२१ | ४१ | १६००-२३०० ओलिताखाली |
| एन एल २६० | १११-११५ | ४३ | ११००-१८०० |

| जवसावरील कीड आणि रोगांचे नियंत्रण | | |
|---|---|---|
| अ.नं. | कीड/ रोगाचे नाव | उपाययोजना |
| अ | कीड | |
| १ | गादमाशी | या किडीच्या नियंत्रणाकरिता डायमिथोएट ३० टक्के प्रवाही १५ मि.लि. १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| ब | रोग | |
| १ | अल्टरनेरिया ब्लाईट | थायरम ३ ग्रॅम प्रतिकिलो बियाण्याला बीजप्रक्रिया करावी. मॅन्कोझेब ०.२५ टक्केची फवारणी करावी. (२५ मि.लि. + १० लिटर पाणी) |
| २ | भुरी | या रोगाचा प्रसार हवेद्वारे होतो. या रोगाच्या नियंत्रणाकरिता पाण्यात मिसळणारी गंधकाची भुकटी २५ ग्रॅम किंवा क्याराथेन १० लिटर पाण्यात मिसळून रोग दिसताक्षणीच फवारणी करावी व दुसरी आवश्यकता भासल्यास १५ दिवसांनी करावी. |
| ३ | मर | पेरणीपूर्वी २ ग्रॅम बाविस्टीन + २ ग्रॅम थायरम प्रतिकिलो बियाण्यास चोळावे. |



लागवडीस २५ किलो नत्र व २५ किलो स्फुरद प्रतिहेक्टरी (म्हणजेच १२५ किलो २०:२०:० मिश्रखत) पेरणीच्या वेळेस द्यावे. तसेच बागायती लागवडीसाठी ६० किलो नत्र + ३० किलो स्फुरद प्रतिहेक्टरी द्यावे. त्यापैकी पेरणीच्या वेळेस अर्धा नत्र (३० किलो) + संपूर्ण स्फुरद (३० किलो) म्हणजेच १५० किलो २०:२०:० मिश्रखत द्यावे. राहिलेल्या अर्ध्या नत्राची मात्रा (३० किलो नत्र म्हणजेच ६५ किलो युरिया) ४०-४५ दिवसांनी पहिल्या ओलितासोबत द्यावी. तसेच या पिकास ५ किलो पी.एस.बी. व ५ किलो झिंक सल्फेट पेरणीच्या वेळेस द्यावे.

**पाणी व्यवस्थापन** : या पिकास दोन ओलिताची आवश्यकता आहे. पहिले पाणी पीक फुलोऱ्यावर असताना म्हणजेच ४०-४५ दिवसांनी व दुसरे पाणी ६५-७० दिवसांनी बोंड्या धरण्याच्या वेळेस द्यावे.

**आंतरमशागत** : जवसाचे पीक पहिले ३० दिवस तणविरहित ठेवले तर उत्पादनात वाढ होते. पेरणीनंतर २५ दिवसांनी पहिली डवरणी करणे आवश्यक आहे. तणाचा प्रादुर्भाव लक्षात घेता निंदणी करावी.

**पीक काढणी** : पिकाची पाने व बोंड्या पिवळ्या पडल्यावर पीक काढणीस योग्य समजावे. या पिकाची कापणी विळ्याच्या सहाय्याने करावी. कापणी झाल्यानंतर ४-५ दिवस वाळवून मळणी करावी व बियाणे योग्य प्रकारे साठवून ठेवावे. ■